अपर राज्यकर आयुक्त, प रिक्षेत्र ३ मुंबई, वस्तू व सेवाकर विभाग
यांचे कार्यालय, 8 वा मजला, सी- विंग, जुनी इमारत, माझगांव, मुंबई-400010.

**सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत.**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार या विभागातील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी नोडल/अपिल कामकाजाचा अनुभव असणारे राज्यकर अधिकारी/निरीक्षक (राजपत्रित/अराजपत्रित) गट-ब या पदावरून सेवानिवृत्त झालेले राज्यकर अधिकारी/निरीक्षक, यांची आवश्यकता आहे. यास्तव प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी नोडल/अपिल कामकाजांचे अनुभव असणारे राज्यकर अधिकारी/निरीक्षक संवर्गातील सेवानिवृत्त झालेले अधिकारी/निरीक्षक यांची करार पद्धतीने एकुण पाच पदाकरिता नियुक्ती करण्यासाठी सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/निरीक्षक यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त अर्जांमधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासुची तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून योग्य उमेदवाराची नेमणूक सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधिन राहून करार पद्धतीने करण्यात येईल.

सक्षम उमेदवारांच्या निवडीबाबतचे अंतिम अधिकार तसेच पदांच्या संख्येत आवश्यक तो फेरबदल करण्याचा अधिकार राज्यकर सहआयुक्त नोडल विभाग-09,माझगाव, मुंबई यांना राहतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. उपरोक्त नमूद केलेल्या सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/निरीक्षक मुल्यवर्धीत कर कायदा २००२ , मुंबई विक्रिकर कायदा १९५९ आणि केंद्रिय विक्रिकर कायदा १९५६/ वस्तू व सेवाकर कायदा 2017 अंतर्गत नोडल/अपील कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.

२. सदर अर्जदार सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/निरीक्षक यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी.

३. अर्जदार मानसिक, शारिरिक व आरोग्यदृष्ट्या सक्षम असावा तसेच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

४. वित्तलब्धी-पात्र उमेदवारांची नेमणूक करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता ) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणा-या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे ) कायम राहील.

५. उपरोक्त नमूद केलेल्या विविक्षित कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

६. आवश्यकता भासल्यास उमेदवाराची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल.

७. नामिकासुचीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या त्यांच्या कामाबाबत नियंत्रक अधिकारी समाधानी नसेल, तर अशा नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांच्या सेवा तात्काळ प्रभावाने रद्द करण्याबाबतचे अधिकार राज्यकर सहआयुक्त नोडल विभाग-09, मुंबई यांना राहतील

वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/निरीक्षक यांनी आस्थापना अधिकारी, अपर राज्यकर आयुक्त, परीक्षेत्र ३ मुंबई, वस्तू व सेवाकर विभाग, तळ मजला, जी विंग, केबिन नंबर- जी -०३, माझगाव मुंबई यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विहित नमुन्यातील अर्ज टपालाद्वारे अथवा ई-मेल (eoreturn@gmail.com) द्वारे सादर करावेत.

**आवेदन पत्र**

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव
२. जन्म तारीख
३. संपर्कासाठीचा पत्ता
४. भ्रमणध्वनी क्रमांक
५. ई-मेल
६. सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद
७. सेवानिवृत्तीचा दिनांक
८. सेवानिवृत्तीचे कार्यालय
९. सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी
१०. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या तीन नेमणुका
११. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी
१२. शैक्षणिक अर्हता
१३. संगणकीय ज्ञान
१४. विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय? असल्यास विवरण द्यावे.
१५. कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (१०० शब्दांमध्ये) (अपिल कामकाजासह)

स्वाक्षरी

दिनांक

सही/-

राज्यकर सहआयुक्त (नोडल-०९)
वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई.

Scanned with OKEN Scanner